# Research Paper Presented In Conference & Seminar Academic Year 2018-19



# CERTIFICATE

# INDIAN COUNCIL & SOCIAL SCIENCE RESEARCH

**(Western Regional Center, Mumbai)**

&

**JEEVANDEEP SHAIKSHANIK SANSTHA'S**

## Arts, Commerce & Science College, Khardi

Tal. Shahapur, Dist. Thane

(Affiliated to Mumbai University)

**Organized by**

**Two Days Interdisciplinary National Conference**

**on**

## 'Impact of Globalization on Indian Tribal Community'

*This is to Certify that Prof./Dr./Mr./Miss* दत्ता एम. लंगलवाड

*Of* कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर (गढी) गेवराई, जि. बीड.

*Actively Participated / Chaired a Session / Presented a Paper Entitled*

आदिवासी समुदायावर जागतिकीकरणाचे झालेले परिणाम - एक समाजशास्त्रीय अभ्यास.

*In Nation Conference on 01st & 02nd March 2019.*



Prof. Bhutale Dattatray
Convener

Prof. K. R. Kalkate
I/C Principal

Shri. Ravindra Ghodvinde
President of JSSP.

Special Issue, March 2019

International Multilingual Refereed Research Journal

UL/03051/2012
ISSN-2319 9318

Vidyawarta®

# Indian Council And Social Science Research

(Western Regional Center,Mumbai)
And

## Jeevandeep Shaikshanik Sanstha
## Arts, Commerce & Science College, Khardi

Tq.Shahapur, Dist.Thane.
(Affiliated to Mumbai University)

2018-19
conferme
Thane



Organized

Two Day's Interdisciplinary National Conference on

# Impact of Globalisation on Indian Tribal Community

On Dated : 01 & 02 March, 2019

Organized By
Jeevandeep Shaikshanik Sanstha
**Arts, Commerce & Science College, Khardi,**
Shahapur,Dist-Thane- 421601

Prof. D.M.Bhutale
Convener.

Prof.K.R. Kalkate
I/C. Principal

**31**

# आदिवासी समुदायावर जागतिकीकरणाचे झालेले परिणाम—एक समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. दत्ता एम. तंगलवाड**
सहाय्यक प्राध्यापक आणि समाजशास्त्र विभागप्रमुख,
कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर (गढी),
ता. गेवराई, जि. बीड

**********

**प्रस्तावना :—**

जागतिकीकरण ही संपूर्ण विश्वाला गवसणी घालणी अर्थिक प्रक्रिया असून, संपूर्ण जगाची मोठया बाजारपेठेत रूपांतर करणारी प्रक्रिया आहे यामुळे विश्व हे एक खेडे बनले आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील १९९१ मध्ये झालेला गॅट करार आणि १९९५ मध्ये जागतिक व्यापारी संघटनेचा उदय झाल्यामुळे दळणवळणाची साधनाचे वाढले, दुरध्वनी संगणक, मोबाईल, इंटरनेट, इत्यादी प्रसार माध्यमे यांचा वेगाने विकास झाला. परिणामी विकसीत राष्ट्रानी अविकसीत राष्ट्रामध्ये मोठया प्रमाणात गुंतवणूक केली. त्यामुळे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाला चालना मिळाली आणि कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेचे नामोनिशाण नष्ट झाले. मोठ मोठया उद्योगाची स्थापना भांडवलदारांनी केली. सार्वजनिक क्षेत्रातील मोठे उद्योग धनाढ्य उद्योगपतीनी ताब्यात घेतली. शाळा, वीज महामंडळे यांचे देखील खाजगीकरण झाले. एवढेच नव्हेतर बँकांचे देखील खाजगीकरण झाले. परिणामी गरीब व श्रीमंतामधील दरी वाढण्यास चालना मिळाली यामुळे शासनाने समाजाप्रती असलेली जबाबदारी झटकण्यास सुरूवात केली. यामुळे आज देशातील ७० टक्के संपत्ती ही केवळ २०टक्के लोकांच्या हातात गेली आणि **श्रीमंत** हे **श्रीमंत** होत गेले तर **गरीब हे गरीबच राहिले** आणि १९७० मध्ये गरीबी हटावोचा नारा देणाऱ्या सरकारला २०१३ मध्ये अन्नसुरक्षा विधेयक तयार करावी लागले. याचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष श्रेय जागतिकीकरणाला जाते. संपत्ती मिळविण्याच्या नादात माणसाने नैतिक व मानवी मुल्यांना पायदळी तुडवले. जागतिकीकरणामुळे नागरी भागात उद्योगधंद्यात वाढ झाल्यामुळे शहरांची संख्या शहरांची लोकसंख्या झपाटयाने वाढली त्यामुळे त्याचे परिणाम ग्रामीण नागरी व आदिवसी समाजावर झालेले दिसून येतात. त्यापैकी कोणकोणते परिणाम आदिवासी समाजावर झाले याचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत लघु शोध निबंधात घेण्यात आला आहे.

**संशोधन विधान:—आदिवासी समुदायावर जागतिकीकरणाचे झालेले परिणाम एक समाजशास्त्रीय अभ्यास.** हा विषय घेवून विषयाची मांडणी शास्त्रीय पध्दतीने करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन पध्दती:—** प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी करण्यासाठी वर्णनात्मक सशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला.

**संशोधनाची उदिष्टये :—**प्रस्तुत संशोधनात पुढील उदिष्टये साध्य करण्याच्या दृष्टीने संशोधन कार्य करण्यात आले.

१. जागतिकीकरणाची संकल्पना समजावून घेणे.

२.जागतिकीकरणाचे आदिवासी समुदायाच्या सामाजिक व सांस्कृतीक जीवनात झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

३.जागतिकीकरणामुळे आदिवासीचे आर्थिक जीवन कसे प्रभावी झाले याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके :—**गृहितके ही संशोधनातील कार्यवाहक विचार असल्यामूळे पुढीलप्रमाणे गृहितकाची मांडणी करण्यात आली.

१.जागतिकीकरणामुळे आदिवासी समुदायाचे सामाजिक जीवन प्रभावित झाले आहे.

२.जागतिकीकरणाचे आदिवासी समुदायावर इष्ट व अनिष्ट परिणाम झालेले दिसून येतात.

**तथ्य संकलनाची साधने:—**

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी दुय्यम

साधनाचा अवलंब करण्यात आला. यात संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्र, नियतकालिके, मासिक व विविध वेबसाईटचा वापर करण्यात आला.

**संशोधनाची क्षेत्र मर्यादा :—**

जागतिकीकरणामुळे समग्र मानवी जीवनाचे सर्वच क्षेत्र प्रभावित झालेली आहेत आणि लघुशोध निबंधात सर्वच बाबींवर प्रकाश टाकणे अशक्य आहे म्हणुन प्रस्तुत संशोधनात आदिवासी समुदायावर जागतिकीकरणाचे झालेले परिणाम अभ्यासण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**माहितीचे विश्लेषन:—**

भारतीय समाजाची प्रामुख्याने तीन भागात विभागणी केली जाते. प्रगत समाज (नागरी समुदाय) मागास समाज (ग्रामीण समाज) आणि अती मागासलेला समुदाय म्हणजे आदिवासी समुदाय होय. स्वातंत्र्याच्या ७१ वर्षात देशाचे मुळ निवासी असलेल्या आदिवासी समुदायाच्या विकासासाठी अनेक योजनाची अंमलबाजवणुक करून सुध्दा त्यांचा विकास झाला नाही. आदिवासी समाज हा सिंधु संस्कृतीपासुन भारताच्या दऱ्याखोऱ्यात, डोंगरात, जंगलात, अतिदुर्गम भागात राहणारा समाज म्हणून ओळखले जाते. इ.स. पुर्व २५०० पासून हा समाज उपेक्षित वर्ग म्हणुन ओळखला जातो. आर्यांनी आक्रमण करून मुळ निवासी असणाऱ्या लोकांना कधीच मुख्य प्रवाहात येवुच दिले नाही आणि आदिवासी लोकांनी आपली संस्कृती टिकवण्याचा अनेक पिढ्या उपेक्षित राहिल्या म्हणून या लोकांनी महात्मा गांधीनी **'गिरीजन'** असे संबोधले होते.समान भाषा बोलणाऱ्या समान नाव धारण करणाऱ्या, संस्कृतीचे जतन करणाऱ्या, विशिष्ट भौगोलिक प्रदेशात राहणाऱ्या, विशिष्ट बोली असलेला व शिक्षण व विकासाच्या प्रवाहापासून अलीप्त असलेला समुदाय म्हणजे **'आदिवासी समुदाय'** होय. हा समृदाय डोंगराळ भागातील दऱ्याखोऱ्यातील वास्तव करणारा समूदाय आहे. पाडा, तांडा, वाडी, माडा या नावाने त्यांच्या वास्तव्याचा ठिकाणाला ओळखले जाते. भारतात एकूण ४२८ जमाती असुन त्यापैकी ४५ जमाती महाराष्ट्रात कायम वास्तव्यास आहेत. त्यापैकी भिल्ल, गोंड, पावरा, ठाकुर, वारली, कातकरी, कोळी महादेव, मन्नेरवाल, पारधी या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. जी.एस.घुर्ये यांनी मागासलेले हिंदु असे म्हटले. तर भारतीय संविधानात अनुच्छेद ३६६(२५) मध्ये अनुसूचीत जमाती असा उल्लेख केलेला आहे. अशा या आदिवासी जमातीवर जागतिकीकरणामुळे काय परिणाम झाले हे शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे. जागतिकीकरणाचे आदिवासी समुदायावर चांगले आणि वाईट असे दोन्ही प्रकारचे परिणाम झालेले दिसून येतात. जागतिकीकरणामुळे आदिवासी समुदायातील लोक प्रगत समाजाच्या संपर्कात आल्यामुळे त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात बदल झालेले दिसून येतात. त्यांची कुटूंबव्यवस्था, विवाह पध्दती, वैवाहिक संबंधात यावर प्रगत समाजाचा मोठा प्रभाव पडला. त्यामुळे दऱ्याखोऱ्यात राहणारा आदिवासी समाज आज नवीन आकार घेताना दिसून येतो. अशाप्रकारे झालेला विभिन्न बदलापैकी निवडक बदलांचा आढवा पुढील प्रमाणे.

**जागतिकीकरणाचे परिणाम:—**

**१.प्रगत समाजाचा संपर्क :—**

भारतातील सर्वच क्षेत्रात औद्योगिकरणाचा प्रसार झाल्यामुळे पोटाची खळगी भरण्यासाठी केवळ जंगलीसंपतीवर अवलंबून न राहत आदिवासी माणसाने औद्योगिक क्षेत्रात रोजमजुरी मिळवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांना आपले वस्तीस्थान सोडुन शहरी भागात वास्तव्यास सुरूवात केली परिणामी आदिवासी समाज बांधव नागरी व ग्रामीण समुदायाच्या सामाजिक जीवनाच्या संपर्कात असल्यामुळे त्यांच्या पारंपारीक जीवन पध्दतीत बदल झाला. त्यांच्या पारंपारिक अनिष्ठ प्रथा परंपरा काळाच्या ओघात होताना दिसुन येतात. तसेच विवाह पध्दती, कुटूंब व्यवस्था, शेती करण्याची पध्दती या मध्ये बदल झालेला दिसुन येतो. एवढेच नव्हेतर त्यांची पारंपारिक मनोरजंनाची साधने, संगीताची साधने यामध्ये देखील बदल झालेला आहे. याचे सर्व श्रेय जागतिकीकरण व नागरीकरणाला जाते.

**२.रोजगार निर्मिती :—**

जागतिकीकरणामुळे अविकसीत देशात विकसीत देशाने मोठया प्रमाणात उद्योगधंद्यांची निर्मीती केली. त्यासाठी लागणारा श्रमीक वर्ग म्हणुन आदिवासी

व काम करताना दिसुन येतात. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास कांही प्रमाणात मदत झाली. तसेच मालपदार्थ तयार करण्याच्या पारंपारीक पध्दतीवर स्थलांतरामुळे मर्यादा येवुन व्यसनाधिनतेचे प्रमाण काही प्रमाणात कमी झाले. त्यामुळे त्यांच्या राहणीमान व जीवनमानाचा दर्जा उंचावला. तसेच प्रगत समाजाच्या संपर्कामुळे आचार–विचार, बोलीभाषा, आहार विहार यामध्ये देखील सकारात्मक बदल झालेला दिसुन येतो. अनेक स्थलांतरीत आदिवासी बांधवांनी प्रतिष्ठेच्या नावाखाली मांसाहार व व्यसनाधीनता वर्ज केल्याचे दिसुन येते.

**.धर्मांतर :—**

औद्योगिक क्षेत्रात काम करणे, नवनवीन व्यवसायिक लोकांशी संपर्क, मानवी जीवनात पैशाचे वाढत चाललेले महत्व, आदिवासी बांधवांच्या लक्षात आल्यामुळे तसेच अल्पसंख्यांक धर्माकडुन दिले जाणारे प्रलोभन याला बळी पडुन अनेक बांधवांनी वेगवेगळया धर्मात धर्मांतर केल्याचे दिसुन येत.

**४.शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार:—**

जागतिकीकरणामुळे संपुर्ण एक Globle Villege बनले आहे. परिणामी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसार झाला. जगातील बहुतांशी देशात वस्ती तिथे शाळा स्थापन केल्यामुळे आदिवासी बांधवांच्या वाडी, तांडे, पाडे यावर शाळा उभारलेल्या दिसुन येतात. त्यामुळे त्यांना शिक्षणाची संधी काही प्रमाणात मिळाल्यामुळे साक्षरतेचे प्रमाण वाढले. मराठी माध्यम, इंग्रजी माध्यम, सेमी इंग्रजी शाळा, इत्यादी खाजगी शाळेचे जाळे सर्वत्र पसरल्यामुळे त्याचा कांही प्रमाणात का होईना लाभ झालेला दिसुन येतो.

**जागतिकीकरणाचे अनिष्ठ परिणाम किंवा तोटे:—**

जागतिकीकरणामुळे मानवी जीवनाला गती आली. जग आज एक खेडे बनले असले तरी त्याचे अनेक वाईट परिणाम भारतातील सर्व जाती धर्मांच्या लोकांना भोगावे लागत आहे. मग त्याला आदिवासी समाज कसा अपवाद असेल. आदिवासी समाज जीवनावर झालेले वाईट परिणाम आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१.जंगल व जमिनी विषयी धोरण:—

जागतिकीकरणामुळे ग्रामीण व आदिवासी भागात मोठया प्रमाणात उद्योगधंद्याची स्थापना करण्यासाठी शासनाने विशेष सवलती दिल्या. परिणामी अनेक उद्योजकांचा ओढा या भागाकडे वाढलेला दिसतो. उद्योगधंद्याच्या स्थापनेच्या नावाखाली उद्योजकांनी ग्रामीण व आदिवासी भागातील हजारो एकर जमीन सेझच्या नावाखाली हडप केल्याचे दिसुन येते. अनेकदा या जमिनी सक्तीने ताब्यात घेतल्या. परंतु जमिनींचा दिलेला मोबदला खुपच कमी असतो. त्यामुळे अल्पभुधारक असलेल्या आदिवासी समुदायातील लोक आज भुमीहीन झालेले दिसुन येतात. जंगलविषयक कायद्यामुळे जंगलातील मौल्यवान अन्नपदार्थ उदाहरणार्थ डिंक, जंगलातील मोह इत्यादी गोळा करणे, शिकार करणे, स्थलांतरीत शेती करणे अशक्य झाले आहे, त्यामुळे सामान्य आदिवासी माणुस मेटाकुटीला आलेला दिसुन येतो.

**२.आर्थिक शोषण :—**

आदिवासी समुदायातील बहुतांशी लोकांना पुरेशा प्रमाणात अक्षरओळख नसल्यामुळे जुन्या पिढीतील लोकांना उद्योजकांनी अक्षरश: लुटल्याचे दिसुन येते. केलेल्या श्रमाचा योग्य मोबदला त्यांना दिला जात नाही. जास्तवेळ काम करून घेवुन अल्प प्रमाणात मोबदला दिला जातो. तसेच विवाह किंवा इतर सण समारंभासाठी घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीच्या नावाखाली वेठबिगारी करून घेतली जाते. तर काही जणांच्या जमिनी हडप केलेल्या दिसुन येतात. यामध्ये काही प्रमाणात बदल झालेला असला तरी आर्थिक शोषण अजुनही थांबलेले नाही हे वास्तव विसरून चालणार नाही. जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे आधुनिक माणुस नैतिक मुल्य व मानवी मुल्य विसरत चाललेला असल्यामुळे सामान्य माणसाला जीवन जगणे अशक्य झालेले आहे.

**३.आरोग्याच्या समस्येचे गंभीर रूप धारण केले:—**

नागरी भागातच नव्हे तर ग्रामीण व आदिवासी समुदायात देखील विविध प्रकारचे कारखाने उदयाला आल्यामुळे कारखाना परिसरात हवा प्रदूषण, दुषित पाणी, दूषित वातावरण यामुळे आरोग्याच्या समस्या गंभीर बनलेल्या आहेत. गलिच्छ वस्तीतील घरे, सदोष

घररचना, छप्पर आणि कुडाची घरे, घराजवळच जनावरांचा गोठा त्यामुळे संसर्गजन्य रोगाचे प्रमाण वाढुन वेळोवेळी वेगवेगळया आजारांना तोंड द्यावे लागते त्यामुळे आदिवासी बालके वेगवेगळया रोगांना बळी पडलेले दिसुन येतात. आधुनिक लोकांशी वाढत्या संपर्कामुळे पैशाची लालसा वाढल्यामुळे गैरमार्ग आणि अनैतिक मार्गाने पैसे मिळवण्याच्या नादात अनेक गुप्तरोगांना बळी पडलेल्या लोकांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असलेले दिसुन येते.

**४.मनोरंजनाची साधने,व्हॅटसअप,फेसबुकचे युवा पिढीवर विपरीत परिणाम.:—**

आदिवासी समुदायाचा नागरी समुदायाशी संपर्क वाढल्यामुळे चित्रपट, नाटक, संगीत, नृत्य यांचा परिणाम होवुन वाममार्गाला लागणाऱ्या तरूणांचे प्रमाण वाढत आहे. एवढेच नव्हे तर विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या अविष्कारामुळे देशाच्या सर्वच भागात स्मार्ट फोन आणि माफक दरात मिळणारा इंटरनेट डेटा यामुळे सामान्य माणसाच्या हातात आलेला मोबाईल विद्यमान पिढीचा दिवसातील बराचसा वेळ व्यर्थ घालताना दिसुन येतो. तंत्रज्ञानाच्या योग्य वापरापेक्षा अयोग्य वापरावरच आधुनिक पिढीचा जास्त प्रमाणात ओघ दिसुन येतो.

**५. आर्थिक विषमतेत वाढ. :—**

जागतिकीकरणामुळे भांडवलदार आणि श्रमीक या दोन वर्गाचे निर्माण झालेली दरी ही जागतिकीकरणाची मोठी देणगी आहे. भांडवलदार हे श्रीमंत होत गेले तर गरीब हे गरीबच राहिले. काल मार्क्सने म्हटल्याप्रमाणे गरीब आणि श्रीमंतीत वाढलेली दरी म्हणजेच 'आहे रे व नाही रे' याच्या होणारा संघर्षाचा इतिहास होय. संघर्षातुन समन्वय हा आधुनीक पिढीच्या वाटयाला आलेला दिसुन येतो. आदिवासी समुदायाची स्थिती फारशी वेगळी नाही.

**सारांश:—**

जागतिकीकरणामुळे विकसनशील दशात विविध प्रकारचे उद्योगधंदे निर्माण झाल्यामुळे ठराविक लोकांचे राहणीमान सुधारले. वाढत्या भांडवलशाहीच्या प्रवाहामुळे श्रीमंत आणि गरीब असे दोन गट संपूर्ण जगभर निर्माण झाले. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रचार आणि प्रसारामुळे ग्रामीण व आदिवासी लोकांचे राहणीमान थोडेफार सुधारले असेल पण त्यांच्या जीवनमानात फारसा सकारात्मक परिणाम झालेला दिसुन येत नाही. आदिवासी समुदायच्या सामाजिक, सांस्कृतीक, जीवनात घडुन येणाऱ्या बदलामध्ये जागतिकीकरणाचे मोलाचे योगदान आहे. प्रगत समाजाच्या संपर्कामुळे आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक प्रथा व परंपरा आणि जीवन पध्दती यामध्ये बदल घडुन आले. पारंपारिक घरगुती व्यवसायाचे स्वरूप बदलल्यामुळे रोजगाराचा प्रश्न निर्माण होवुन अनेक स्थलांतरीत समुदाय एका भागातुन दुस—या भागात वास्तव्य करताना दिसुन येतात. आर्थिक विषमतेत झालेली वाढ, नैतिक व मानवी मुल्यांचा ऱ्हास यामुळे लोककल्याणाची संकल्पना काळाच्या ओघात नष्ट होत चाललेली दिसुन येते. त्यामुळे सामान्य माणुस मेटाकुटीला आलेला आहे. वेळोवेळी पुढारलेल्या लोकांकडुन त्यांची फसवणुक होत असलेली दिसुन येते.

**निष्कर्ष:—** प्रस्तुत अध्यायनात हाती आलेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१. जागतिकीकरणामुळे आदिवासीच्या सामाजिक व सांस्कृतिवर जीवनावर परीणाम होवून पारंपरीक चालिरीती व प्रथा व परंपरात बदल झाला तसेच विवाह विधी कुटंबपध्दतीचे स्वरूप बदलले.

२. जागतिकीकरणामुळे रोजगाराचे नवनवीन क्षेत्र निर्माण झाले असले तरी आदिवासीच्या पारंपरीक व्यावसायावर दुरगामी परीणाम झालेले दिसून येतात.

३. खाजगीकरण हे जागतिकीकरणामुळे आपत्ये आहे. उद्योगाच्या विस्ताराच्या नावाखाली आदिवासीच्या जमिनी हडप केल्या.

४. प्रगत समाजाच्या संपर्कामूळे नविन विचारसरणीचा प्रभाव आदिवासीच्या विचारावर पडल्यामूळे तसेच स्थलांतरामूळे गलिच्छ वस्तीतील घरे, सदोष घररचना, छप्पर आणि कुडाची घरे, जवळच जनावरांचा गोठा त्यामुळे संसर्गजन्य रोगाचे प्रमाणे वाढुन आदिवासी बालक वेगवेगळया रोगांना बळी पडलेले दिसुन येतात.

५. प्रगत समाजाच्या वाढत्या संपर्कामुळे पैशाची लालसा वाढल्यामुळे गैरमार्गाना आणि अनैतिक मार्गाने पैसे मिळवण्याच्या नादात अनेक गुप्तरोगांना बळी

...लेल्या लोकांचे वाढते प्रमाण ही जागतीकीकरणाची
...ला आहे

संदर्भ:—

१. जगन कराडे,(२००८),जागतिकीकरण व भारतासमोरील अव्हाने,डायमंड प्रब्लिकेशन पुणे.

२. पंडित नलिनी,(२००१), जागतिकीकरण ते भारत,लोकवाड्मयग्रह,मुबंई.

३. घोडके अमोल, (२०१३),भारतातील मानव संसाधन विकास, युनिक अकॅडमी,पुणे.

४. साठे मधुसूधन,(२००८) ,जागतिक अर्थकारण —आशियातील अर्थकारण, डायमंड प्रकाशन पुणे.

५. आगलावे प्रदिप,(२०१२)आदिवासी समाजाचे समाजशास्त्र,श्री साईनाथ प्रकाशन,नागपूर.

६. कऱ्हाडे बी. एम.,(२०१२) आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, पिंपळापूरे ॲण्ड कं पब्लिशर्स, नागपूर.

७. जाधव सुधाकर एल.,(२०१२) आदिवासी समाजाचे समाजशास्त्र,चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

□□□

32

# जागतिकरणाचा भारतीय आदिवासी संस्कृतीवर झालेला परिणाम:एक आभ्यास

संध्या रूस्तुम येवले
संशोधन विद्यार्थी,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे

**********

जागतीकरण म्हणजे स्थनिक वस्तुंची किंवा घडामोडीची जागतीक स्तरावर स्थानांतराची प्रक्रिया किंवा जागतिकीकरणाचा अर्थ म्हणजे संपूर्ण जगाची एका मोठ्या बाजारपेठेत रूपांतरीत घेण्याची प्रक्रिया होय ही संज्ञा अलिकडे लोकप्रिय झाली असली तरी ही प्रक्रिया १९ व्या शतकापासून सुरू झाली. भांडवल शाही ची वाढ उपलब्ध सागरी दळणवळण, टेलीग्रामपासून ते २० व्या शतकातील उपलब्ध हवाईमार्ग दूरध्वनी, संगणक, बहुराष्ट्रीय कंपन्या, व्यापार आणि गुंतवणुकीवरील निंबंध यामधील लवचिकतेतून जागतिकीकरण सुरू झाले. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकोणिसाव्या शतकाच्या पुर्वाधात माहिती तंत्रज्ञान इंटरनेट आणि सेवांचा व्यापार जागतिक पातळीवर खुला झाल्याने जागतीकीकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतला. या जागतिकीकरणचा भारतीय आदिवासी संस्कृतीवर मोठ्या प्रमाणात चांगला व वाईट असा परिणाम झालेला दिसून येतो.

**व्याख्या :—**

१) थॉमसफ्रीडमच्या मते :— ''जागतिकीकरण म्हणजे व्यापार, वित आणि माहितीच्या एकत्रीकरणातून एकच एक अशी जागतिक बाजारपेठ आणि संस्कृतीची निर्मिती होय.''

२)हायब्रीडायझेशन :— सांस्कृतिक आक्रमण आणि मागास राष्ट्रंचे आथक सार्वभौमत्व पायदळी तुडवण्यामुळे